# आळंदी नगरपरिषद कार्यालय, आळंदी

ता. खेड, जि.पुणे.

alandimc२@gmail.com


दिनांक ०६/०४/२०२६

## आस्थापना विभाग
## कुशल, अर्धकुशल व अकुशलमनुष्यबळ पुरविणे
## ई-निविदा सूचना
## सन २०२६-२७

मुख्याधिकारी आळंदी नगरपरिषद, ता.खेड, जि. पुणे मार्फत खालील कामाची ई-निविदा नोंदणीकृत अनुभवी व अर्हता प्राप्त ठेकेदाराकडुन ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा बयाणा रक्कम | निविदा फॉर्म फी | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | आळंदी नगरपरिषद कार्यालयीन व प्रशासकीय कामकाजासाठी **कुशल, अर्धकुशल व अकुशल**मनुष्यबळ सेवा पुरविणे. | **रु.१,४१,०००/-** | **रु.२५,०००/-** | कार्यादेश मिळाल्यापासून ११ महिने |

१) सदर संपूर्ण ई-निविदा प्रक्रिया ई-निविदाव्दारे ऑनलाईन पद्धतीने दोन लिफाफ्यात मागविण्यात येत आहेत. सदर निविदा, नोटीसा, प्रसिद्धी सुचना, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्रके इत्यादीची माहिती http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

२) वरील कामाची निविदा http://mahatender.gov.in या संकेतस्थळावरुन खालीलप्रमाणे दिलेल्या कालावधीत असेल.

| वेळापत्रक | पासून | | पर्यंत | |
|---|---|---|---|---|
| | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ |
| निविदा प्रसिद्धी | दि.०७/०४/२०२६ | स. ११.०० वा. | -- | -- |
| निविदा फॉर्म, परिशिष्ट व इतर कागदपत्रे मिळण्याचा कालावधी (डाऊनलोड) | दि.०७/०४/२०२६ | स. ११.०० वा. | दि. १५/०४/२०२६ | सा.०६.०० |
| निविदा ऑनलाईन भरण्याचा कालावधी | दि.०७/०४/२०२६ | स. ११.०० वा. | दि. १५/०४/२०२६ | सा.०६.०० |
| ऑनलाईन निविदा उघडण्याचा कालावधी | दि.१७/०४/२०२६ रोजी स.१०.०० वा. किंवा प्रशासकीय सोयीनुसार उघडण्यात येतील. | | | |

**३) ई-निविदा उघडण्यात आल्यापासून त्याची विधी ग्राह्यता ९० दिवस राहील.**

४) कोणतेही कारण न देता प्राप्त निविदा स्विकारणेचा अथवा फेटाळणेचा संपुर्ण अधिकार आळंदी नगरपरिषदेकडे राहील.

**सही/-**
(माधव खांडेकर)
मुख्याधिकारी
आळंदी नगरपरिषद, आळंदी

## -: CONTENTS :-

| अ.क्र. | तपशिल | पान क्रमांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १ | टेंडर नोटीस तपशिल | १ | १ |
| २ | तांत्रिक कागदपत्रांचा तपशिल (परिशिष्ट-A) | ३ | ११ |
| ३ | कागदपत्रे खरी असलेबाबत व काळया यादीत समाविष्ठ नसलेबाबत हमीपत्र / प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट-B) | १२ | १२ |
| ४ | प्रतिज्ञापत्र (नगरसेवक हस्तक्षेप नसलेबाबत) (परिशिष्ट-C) | १३ | १३ |
| ५ | इतर विशेष अटी व शर्ती (परिशिष्ट-D) | १४ | १७ |

# आळंदी नगरपरिषद कार्यालय, आळंदी

ता. खेड, जि.पुणे.

alandimc२@gmail.com


## परिशिष्ट -A

| अ.क्र. | तांत्रिक कागदपत्रांच्या अटी व शर्तीचा तपशिल |
|---|---|
| १ | टेंडर फॉर्म फी व बयाणा रक्कम ऑनलाईन प्रत. |
| २ | महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवा शर्तीचे विनियमन) अधिनियम २०१७ नमुना "ब" नोंदणी प्रमाणपत्र. |
| ३ | पी.एफ. (PF) नोंदणी प्रमाणपत्राची प्रत तसेच मागील १२ महिन्याचे चलन प्रत जोडणे बंधनकारक आहे. |
| ४ | ई.एस.आय. (ESI) नोंदणी प्रमाणपत्राची प्रत तसेच मागील १२ महिन्याचे चलन प्रत जोडणे बंधनकारक आहे. |
| ५ | महाराष्ट्र कामगार कल्याण निधी (Welfare Board) नोंदणी प्रमाणपत्राची प्रत |
| ६ | व्यवसाय कर प्रमाणपत्राची प्रत |
| ७ | जी.एस.टी. प्रमाणपत्र |
| ८ | मागील तीन वर्षाचे आयकर प्रमाणपत्र<br>(ITR Certificate AY २०२३-२४, AY २०२४-२५, AY २०२५-२६) |
| ९ | शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये किमान ३ वर्षाचा मनुष्यबळ पुरवठा केलेले काम /कामे याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र. |
| १० | निविदाकाराला गेल्या ५ वर्षामध्ये शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था / महामंडळाने काळ्या यादी टाकलेले नाही व निविदसोबत सादर केलेल्या कागदपत्रांची सत्यता दर्शविणारे हमीपत्र / प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट-D) रु. १००/- चे स्टॅम्प पेपरवर सादर करणे |
| ११ | नगरसेवकांचा कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष सहभाग किंवा नाते संबंध नसलेबाबतचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट-G) |
| १२ | राष्ट्रीयकृत बँकेचे / नामांकित खाजगी बँकेचे सोलवंसी प्रमाणपत्र (Solvency Certificate) ५० लाखापर्यंत |
| १३ | पॅनकार्डची प्रत कंपनी भागिदारी संस्था निविदा भरत असेल तर संबंधित कंपनी / भागिदारी संस्था यांच्या नावाचे पॅनकार्ड असणे आवश्यक आहे. प्रोपायटरी फर्म्सचे पॅनकार्ड प्रोपायटरच्या नावाने असणे आवश्यक आहे. |
| १४ | निविदाकाराचा आर्थिक वर्ष २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ या ३ वर्षातील सरासरी वार्षिक उलाढाल किमान दिड कोटी (१.५cr) असल्याबाबतचे CA यांनी प्रमाणित केलेले Turn Over Certificate |
| १५ | दिनांक ३१ मार्च २०२५ पर्यंतचे CA ने प्रमाणित केलेले नेटवर्थ प्रमाणपत्र |
| १६ | ठेकेदाराचे अनुभव प्रमाणपत्र १ कोटी पर्यंत असणे आवश्यक. |

| | |
|---|---|
| १७ | इच्छुक निविदाधारकांनी ई-निविदा भरल्यानंतर संपुर्ण निविदेतील सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती नगरपरिषदेकडे सादर करण्यात यावी. |
| १८ | मंजूर निविदाधारकास कर्मचाऱ्यांचा एका महिन्यातीन वेतनाचा आगाऊ धनाकर्ष (Demand Draft) कार्यादेश देण्यापुर्वी नगरपरिषदेकडे जमा करणे बंधनकारक आहे. |

**A-२)लिफाफा क्रमांक २ मध्ये BOQ(Bill Of Quantity) दर (सेवा शुल्क %) सादर करणे :**

१) लिफाफा क्र. १ तांत्रिक कागदपत्रांमधील पात्र कंत्राटदारांचेच आर्थिक लखोटे (लिफाफा क्र.२) उघडण्यात येतील.

२) निविदाधारकांनी BOQ (Bill Of Quantity) मध्ये दिलेल्या सुचनाप्रमाणे दर(%) नमुद करावेत.

३) सदर कामाची निविदा ही मनुष्यबळ पुरविणे संदर्भात असल्याने महाराष्ट्र शासनाकडील दिनांक २४/०२/२०१५ रोजीचे राजपत्र अन्वये पुन:र्निर्धारित करण्यात आलेले वेतन व मा. कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई यांचेकडील सुधारीत विशेष भत्ता नुसार किमान वेतन निश्चित करण्यात आले आहे व त्याप्रमाणे कामगारांना मिळणारे मुळ वेतन + विशेष वेतन व या व्यतिरीक्त मिळणारे भत्ते यांचा समावेश करुन एकत्रित किमान वेतनाची रक्कम सदर निविदेतील BOQ (Bill Of Quantity) मध्ये कुशल, अर्धकुशल व अकुशल या प्रमाणे त्यांचे समोर दर्शविण्यात आले असून त्याप्रमाणेच कर्मचाऱ्यांना वेतन अदा करणे आवश्यक आहे.

४) **नगरपरिषदेमार्फतनिश्चित केलेल्या एकुण किमान वेतनावरBOQ (Bill Of Quantity) मध्ये सेवा शुल्क (Service Tax) % मध्ये नमुद करणे आवश्यक आहे.**

**A-३ )इतर आवश्यक अटी व शर्ती :**

१) कंत्राटदारास काम मंजूर केल्यानंतर एक महिन्याच्या आत कामगार कार्यालयाकडील Contract Labour (Regulation and Abolition) अंतर्गत लेबर लायसंन्स सादर करणे बंधनकाक राहील.

२) केंद्र व राज्य शासनाच्या सुधारीत नियमावलीप्रमाणे देयकातून अनुज्ञेय होणारे कर कपात करण्यात येतील.

३) मंजूर कंत्राटदारास विहित किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर अटी शर्तीमध्ये नगरपरिषदेस करारनामा करुन देणे आवश्यक आहे.

४) मंजूर कंत्राटदाराच्या प्रत्येक देयकातून सुरक्षा अनामत म्हणून रक्कम कपात करण्यात येईल व कंत्राट समाप्तीनंतर सहा महिन्यांनी सदरच्या सुरक्षा अनामत रक्कमेचा परतावा कंत्राटदारास देण्यात येईल.

५) नगरपरिषदेमार्फत दिलेल्या सुचनाप्रमाणे कार्यादेश दिल्यापासून नगरपरिषदेच्या विविध विभागाकडील काम स्वत:कडील मनुष्यबळ वापरुन एका वर्षापर्यंत करुन घेणे निविदाधारकांवर बंधनकारक आहे.

६) नगरपरिषदेस आवश्यकता वाटल्यास या व्यतिरीक्त इतर वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करणे व दिलेल्या सुचनानुसार काम करणे बंधनकारक आहे.

७) मनुष्यबळ सेवा पुरविणेकामी उपलब्ध करुन दिलेल्या कर्मचाऱ्यांची शैक्षणिक पात्रता व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र नगरपरिषद कार्यालयात सादर करणे आवश्यक राहील. कंत्राटदाराकडील कर्मचाऱ्यांना नगरपरिषदेत नोकरीवर हक्क सांगण्याचा व कोणत्याही न्यायालयात दावा करणेचा अधिकार राहणार नाही.दैनंदिन कामाची निकड लक्षात घेवून कर्मचारी कमी अथवा जास्त करणेचा सर्व अधिकार नगरपरिषदेकडे राहील.

८) निविदाधारकाने विहित नमुन्यात अभिवाचन पत्र जोडणे आवश्यक राहील.

९) एकुण रक्कम रुपये १० लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त निविदा रक्कमेवरील १ टक्के उत्पंन्नावरील रक्कम शासकीय कामगार कल्याण निधी (उपकर) मध्ये मुख्याधिकारी परस्पर जमा करतील ही अट निविदाधारकांना बंधनकारक आहे.

१०) निविदामध्ये नमूद केलेले दर हे सर्व करासहीत असलेने अभिकर्त्याने ठेक्यावरील कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधी (PF) खाते तसेच विमा खाती, ESI रक्कमतसेच सर्व्हीस टॅक्स भरणेची जबाबदारी अभिकर्त्यांची राहील. मंजूर दरपत्रकाव्यतिरीक्त इतर करवा दर अनुज्ञेय असणार नाही.

११) नगरपरिषदेचे उत्पंन्न हे वार्षिक करातून मिळणारे असल्याने बिल अदा करणेबाबत कोणतीही कालमर्यादा असणार नाही. परंतू बिल प्राप्त होईपर्यंत नेमलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन अभिकर्त्यास वेळेच्या वेळी अदा करणे आवश्यक राहील.

१२) कंत्राटदाराने निविदेतील अटी शर्तीप्रमाणे काम करुन घेतांना कर्मचाऱ्यांना पुढीलप्रमाणे सुविधा देणे बंधनकारक राहील.

अ)निविदेतील अटी शर्तीप्रमाणे काम करुन घेतांना **कुशल, अर्धकुशल**कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासनाकडील दिनांक २४/०२/२०१५ रोजीचे राजपत्र अन्वये पुन:र्निर्धारित करण्यात आलेले वेतन व मा. कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई यांचेकडील **सुधारीत विशेष भत्ता** नुसार किमान वेतन निश्चित करण्यात आले आहे व त्याप्रमाणे कामगारांना मिळणारे मुळ वेतन + विशेष वेतन व या व्यतिरीक्त मिळणारे भत्ते यांचा समावेश करुन एकत्रित किमान वेतन अदा करणे आवश्यक आहे.

ब) सदरचे वेतन हे दर महिन्यातील २६ दिवसांकरिता असेल. सुट्टीच्या दिवशी काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांस नियमाप्रमाणे प्रति दिवसासाठी वेतन अदा करावे लागेल. तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन त्यांचे बँक खात्यात जमा करणे बंधनकारक राहील.

क)कर्मचाऱ्यांना अदा केलेल्या वेतनाची रक्कम, पी. एफ. (PF) भरणा केल्याची चलने, राज्य विमा भरलेली चलने, कामगार कल्याण निधी भरणा केल्याची चलने, इत्यादी माहितीच्या प्रतींचा सर्व तपशिल देयक सादर करतांना सादर करणे कंत्राटदारावर बंधनकारक आहे. याशिवाय वेतन बिल अदा करण्यात येणार नाही.

ड) कंत्राटदारामार्फत नेमलेल्या कर्मचाऱ्यांचे कर्मचारी राज्य विमा योजना अंतर्गत देण्यात येणारे **ESIC CARD** पुरवठा करण्यात यावे.

इ) कंत्राटदाराने नेमलेल्या कर्मचाऱ्यांचे दरमहा कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजनेचा लाभ देवून स्वतंत्र रजिस्टर अद्यावयात ठेवणे बंधनकारक राहील.

ई)निविदा कामाची एकुण सुरक्षा अनामत रक्कम एकुण १०% इतकी असेल. त्यापैकी १% इतकी रक्कम निविदा बयाणा रक्कमेसोबत भरणा करावी लागेल व२% करारनामा करतेवेळी भरावी लागेल तसेच उर्वरित ७% सुरक्षा अनामत रक्कम देयकातून कपात करण्यात येईल. सदरची कपात केलेली सुरक्षा अनामत रक्कम विहित मुदतीनंतर आवश्यक ती कायदेशीर पुर्तता झाल्यानंतर सुरक्षा अनामत परत केली जाईल.

१३) मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारांना भविष्य निर्वाह निधीचा स्वतंत्र कोड घेणे बंधनकारक आहे.

१४)कंत्राटदार संस्थानी पुरविलेल्या कर्मचाऱ्यांचे मासिक हजेरीपत्रक, भविष्य निर्वाह निधी त्या त्या महिन्यात भरल्याबाबत मासिक हजेरीपत्रक, कामगारांचा रिव्हेन्यू स्टॅम्प लावून त्यावर संबंधित कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी असलेले वेतन रजिस्टर कामगारांच्या यादीसह ई.सी.आर, ई.एस.आय. चलन, कामगार कल्याण निधी तसेच सर्व शासकीय लेव्हलची पुर्तता केलेबाबत तसेच संबंधित कामगारांचे मागील महिन्याचे वेतन बँकेमार्फत Account Payee Cross Cheque (रेखांकित धनादेश) व्दारेच अदा केल्याचा पुरावा दरमहा सादर केल्यानंतरच सदर कंत्राटदारांचे त्या महिन्याचे देयक अदा करण्यात येईल.

१५)कंत्राटदारांने कामकासाठी नेमलेल्या कामगांरांचे मासिक वेतन महिन्याच्या १० तारखेपुर्वी करणे बंधनकारक आहे.

१६) पुरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना नियमानुसार साप्ताहिक सुट्टी तसेच मासिक वेतन चिठ्ठी देण्यात यावी.

१७)किमान वेतन दरापेक्षाकमी दराने वेतन अदा करता येणार नाही. वेतन दरापेक्षा कमी दराने वेतन दिल्याचे निर्दशनास आल्यास वेतनातील फरक संबंधित कर्मचाऱ्यांना अदा करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

१८) मा. कामगार कार्यालयामार्फत दर सहा महिन्यांनी प्रसिद्धी करण्यात येणाऱ्या सुधारीत विशेष भत्ता प्रमाणे कर्मचाऱ्यांना वेतन अदा करणे आवश्यक राहील. त्याप्रमाणे सुधारित विशेष भत्यामध्ये वाढ करुन वेतनातील फरक अदा करण्यात येईल.

१९) ज्या कंत्राटी कामगारांनी मा.न्यायालयात दावे दाखल केले आहेत अशा कामगारांना प्रस्तुतचे किमान वेतन लागु राहील.

२०)कुठल्याही नवीन कामगारास घेतांना संबंधित विभाग प्रमुख यांच्याकडुन लेखी मागणी पत्र आल्यास व त्यावर मुख्याधिकारी यांची तसेच लेखापाल व लेखापरिक्षक यांची संमती असल्याखेरीजकर्मचाऱ्यांना कामावर घेता येणार नाही. तसेच आस्थापना विभागाकडुन ठेकेदाराला मनुष्यबळ पुरवठा करणेसाठी कळविल्यानंतर ठेकेदाराने कर्मचारी पुरवठा करतांना त्यांचे लेखी पत्र नगरपरिषदेस देणे बंधनकारक असेल.

२१) ठेकेदाराकडुन पुरवठा करण्यात येणाऱ्या बाह्यसेवा कर्मचाऱ्यांचे कामकाज असमाधानकारक असल्याचे विभाग प्रमुख यांच्या निर्दशनास आल्यास व तसा लेखी अहवाल विभाग प्रमुखांकडुन आस्थापना विभागाकडे प्राप्त झाल्यास ठेकेदाराकडुन संबंधित कर्मचाऱ्यास कामकाजात सुधारणा करणेबाबत नोटीर जारी करणे आवश्यक आहे. तरीही संबंधित कर्मचाऱ्याकडुन कामकाजात सुधारणा न झाल्यास दुसरी व अंतिम तिसरी नोटीस देऊन कामावरुन कमी करुन तसा अहवाल ठेकेदाराने नगरपरिषदेस सादर करावा.

२२) ठेकेदाराने त्यांच्या अंतर्गत नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांना प्रत्येक महिन्याच्या वेतनानंतर वेतन स्लिप देणे ठेकेदारावर बंधनकारक असेल.

२३) ठेकेदाराकडुन प्रत्येक महिन्याला त्यांच्या अंतर्गत काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन आवश्यक सुचना करणे आवश्यक आहे.

२४) विभाग प्रमुखांच्या पुर्व सुचनेशिवाय किंवा परवानगी शिवाय कर्मचारी गैरहजर राहिल्यास विभाग प्रमुखांच्या सुचनानुसार सदर गैरहजर दिवसांचे वेतन कपात करण्यात येईल. तसेच वारंवार पुर्व परवानगीशिवाय गैरहजर राहिल्यास व तसा अहवाल विभाग प्रमुखांकडुन प्राप्त झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यांचे संपुर्ण महिन्याचे वेतन रोखले जाईल.

२५) ठेकेदाराकडुन त्यांचे अंतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे बायोमॅट्रिक हजेरी घेणे बंधनकारक आहे. ठेकेदारामार्फत नगरपरिषद कार्यालयात स्वतंत्र बायोमॅट्रिक मशिन लावणे व मशिनमधून प्रत्येक महिन्याला कर्मचाऱ्यांचे उपस्थित पत्रक काढुन त्याप्रमाणे बिलासोबत सादर करणे आवश्यक राहील. त्याच प्रमाणे सदर मशिनची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

२६) कामगार कार्यालयाकडुन प्रत्येक सहा महिन्याच्या कालावधीत विशेष भत्याची रक्कमेमध्ये वाढ करण्यात येत असते. त्यामुळे ही बाब ग्राह्य धरुन ठेकेदाराने आपले दर नमुद करावयाचे आहेत. विशेष भत्यामध्ये वाढ झालेली रक्कम देण्याची संपुर्ण जबाबदारी ही ठेकेदाराची असून नगरपरिषदेकडुन विशेष भत्यामध्ये वाढ झालेली रक्कम अदा करण्यात येणार नाही.

२७) ठेकेदाराअंतर्गत नियुक्त केलेल्या बाह्यसेवा कर्मचाऱ्यांना गणवेश पुरवठा करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. यासाठी नगरपरिषदेकडुन गणवेशासाठी अतिरीक्त कुठलाही खर्च देण्यात येणार आहे.

२८) ठेकेदाराअंतर्गत नियुक्त केलेल्या बाह्यसेवा कर्मचाऱ्यांना ओळखपत्र देण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

२९) आळंदी हे 'अ' वर्ग तीर्थक्षेत्र असल्याने कार्तिकी यात्रा / आषाढी यात्रा कालावधी मध्ये जादा काम केल्यास अतिरीक्त कोणताही भत्ता ठेकेदाराअंतर्गत नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना लागु राहणार नाही.

३०) ठेकेदाराअंतर्गत नियुक्त केलेल्या बाह्यसेवा कर्मचाऱ्यांनी त्यांना सोपविण्यात आलेल्या विभागाकडील कॉम्प्युटर, प्रिंटर स्वच्छ करण्याची जबाबदारी कर्मचाऱ्यांची राहील.

३१) कामगार पुरवठा करतांना त्यांचे मेडीकल फिटनेस प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

३२) **कुशल व अर्धकुशल कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे शैक्षणिक पात्रता व इतर अर्हता पुर्ण करणे आवश्यक राहील.**

| अ.क्र. | कर्मचारी प्रकार | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| १ | कुशल | किमान पदवी धारण करणे आवश्यक राहील. तसेच राज्य शासनाकडील GCC प्रमाणपत्र मराठी ३० श.प्र.मि. व इंग्रजी ४० श.प्र.मि. असणे आवश्यक राहील. |
| २ | अर्धकुशल | किमान १२ वी उतीर्ण असणे आवश्यक राहील. तसेच MS-CIT कोर्स पुर्ण करणे आवश्यक राहील. |
| ३ | अग्निशमन कर्मचारी**(फायरमन)** | **शैक्षणिक पात्रता :**<br>किमान माध्यमिक शालांत परीक्षा (SSC)उत्तीर्ण असणे आवश्यक आहे व फायरमनचे प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.<br>**शारीरिक पात्रता :**<br>१. उंची - १६५सें.मी.<br>२. छाती- ८१ सें.मी. न फुगवता व फुगवून ८६ सें.मी.<br>३. वजन - ५० किलो<br>४. दृष्टी -चष्म्याशिवाय ५/५ |
| ४ | अग्निशमन **(वाहनचालक कम फायरमन)** | **शैक्षणिक पात्रता :**<br>किमान माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे व फायरमनचे प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.<br>**शारीरिक पात्रता :**<br>५. उंची - १६५सें.मी.<br>६. छाती- ८१ सें.मी. न फुगवता व फुगवून ८६ सें.मी.<br>७. वजन - ५० किलो<br>८. दृष्टी -चष्म्याशिवाय ५/५<br>**वाहन परवाना: जड वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक आहे.** |
| **वयोमर्यादा : सर्व कर्मचाऱ्यांसाठी वयोमर्यादा २१ पेक्षा कमी नसावी व ६० पेक्षा जास्त नसावी.** | | |

३३) केंद्र व राज्य शासनाच्या सुधारीत नियमावलीप्रमाणे देयकातून अनुज्ञेय होणारे कर कपात करण्यात येतील.

३४) मंजूर कंत्राटदारास विहित किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर अटी शर्तीमध्ये नगरपरिषदेस करारनामा करुन देणे आवश्यक आहे.

३५) मंजूर कंत्राटदाराच्या प्रत्येक देयकातून सुरक्षा अनामत म्हणून रक्कम कपात करण्यात येईल व कंत्राट समाप्तीनंतर सहा महिन्यांनी सदरच्या सुरक्षा अनामत रक्कमेचा परतावा कंत्राटदारास देण्यात येईल.

३६) नगरपरिषदेमार्फत दिलेल्या सुचनाप्रमाणे कार्यादेश दिल्यापासून नगरपरिषदेच्या विविध विभागाकडील काम स्वत:कडील मनुष्यबळ वापरुन ११ महिन्यापर्यंत करुन घेणे निविदाधारकांवर बंधनकारक आहे.

३७) नगरपरिषदेस आवश्यकता वाटल्यास या व्यतिरीक्त इतर वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करणे व दिलेल्या सुचनानुसार काम करणे बंधनकारक आहे.

३८) मनुष्यबळ सेवा पुरविणेकामी उपलब्ध करुन दिलेल्या कर्मचाऱ्यांची शैक्षणिक पात्रता व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र नगरपरिषद कार्यालयात सादर करणे आवश्यक राहील. कंत्राटदाराकडील कर्मचाऱ्यांना नगरपरिषदेत नोकरीवर हक्क सांगण्याचा व कोणत्याही न्यायालयात दावा करणेचा अधिकार राहणार नाही. दैनंदिन कामाची निकड लक्षात घेवून कर्मचारी कमी अथवा जास्त करणेचा सर्व अधिकार नगरपरिषदेकडे राहील.

३९) निविदाधारकाने विहित नमुन्यात अभिवाचन पत्र जोडणे आवश्यक राहील.

४०) एकुण रक्कम रुपये १० लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त निविदा रक्कमेवरील १ टक्के उत्पंन्नावरील रक्कम शासकीय कामगार कल्याण निधी (उपकर) मध्ये मुख्याधिकारी परस्पर जमा करतील ही अट निविदाधारकांना बंधनकारक आहे.

४१) निविदामध्ये नमूद केलेले दर हे सर्व करासहीत असलेने अभिकर्त्याने ठेक्यावरील कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधी (PF) खाते तसेच विमा खाती तसेच सर्व्हीस टॅक्स भरणेची जबाबदारी अभिकर्त्यांची राहील. मंजूर दरपत्राका व्यतिरीक्त इतर कर वा दर अनुज्ञेय असणार नाही.

४२) नगरपरिषदेचे उत्पंन्न हे वार्षिक करातून मिळणारे असल्याने बिल अदा करणेबाबत कोणतीही कालमर्यादा असणार नाही. परंतू बिल प्राप्त होईपर्यंत नेमलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन अभिकर्त्यास वेळेच्या वेळी अदा करणे आवश्यक राहील.

४३) कंत्राटदाराने निविदेतील अटी शर्तीप्रमाणे काम करुन घेतांना कर्मचाऱ्यांना पुढीलप्रमाणे सुविधा देणे बंधनकारक राहील.

अ) निविदेतील अटी शर्तीप्रमाणे काम करुन घेतांना **कुशल, अर्धकुशल** कर्मचाऱ्यांना **महाराष्ट्र शासनाकडील दिनांक २४/०२/२०१५ रोजीचे राजपत्र अन्वये पुन:र्निर्धारित करण्यात आलेले वेतन व मा. कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई यांचेकडील सुधारीत विशेष भत्ता नुसार** किमान वेतन निश्चित करण्यात आले आहे व त्याप्रमाणे कामगारांना मिळणारे मुळ वेतन + विशेष वेतन व या व्यतिरीक्त मिळणारे भत्ते यांचा समावेश करुन एकत्रित किमान वेतन अदा करणे आवश्यक आहे.

ब) सदरचे वेतन हे दर महिन्यातील २६ दिवसांकरिता असेल. सुट्टीच्या दिवशी काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांस नियमाप्रमाणे प्रति दिवसासाठी वेतन अदा करावे लागेल. तसेच कर्मचाऱ्यांचे वेतन त्यांचे बँक खात्यात जमा करणे बंधनकारक राहील.

क) कर्मचाऱ्यांना अदा केलेल्या वेतनाची रक्कम, पी. एफ. (PF) भरणा केल्याची चलने, राज्य विमा भरलेली चलने, कामगार कल्याण निधी भरणा केल्याची चलने, इत्यादी माहितीच्या प्रतींचा सर्व तपशिल देयक सादर करतांना सादर करणे कंत्राटदारावर बंधनकारक आहे. याशिवाय वेतन बिल अदा करण्यात येणार नाही.

ड) कंत्राटदारामार्फत नेमलेल्या कर्मचाऱ्यांचे कर्मचारी राज्य विमा योजना अंतर्गत देण्यात येणारे **ESIC CARD** पुरवठा करण्यात यावे.

इ) कंत्राटदाराने नेमलेल्या कर्मचाऱ्यांचे दरमहा कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजनेचा लाभ देवून स्वतंत्र रजिस्टर अद्यावयात ठेवणे बंधनकारक राहील.

ई) निविदा कामाची एकुण सुरक्षा अनामत रक्कम एकुण १०% इतकी असेल. त्यापैकी १% इतकी रक्कम निविदा बयाणा रक्कमेसोबत भरणा करावी लागेत. तसेच उर्वरित ७% सुरक्षा अनामत रक्कम देयकातून कपात करण्यात येईल. सदरची कपात केलेली सुरक्षा अनामत रक्कम विहित मुदतीनंतर आवश्यक ती कायदेशीर पुर्तता झाल्यानंतर सुरक्षा अनामत परत केली जाईल.

४४) मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारांना भविष्य निर्वाह निधीचा स्वतंत्र कोड घेणे बंधनकारक आहे.

४५) या प्रक्रियेमध्ये कर्मचारी राज्य विमा महामंडळ आणि भविष्य निर्वाह निधी च्या नियमांचे पालन करणे कंत्राटदारावर बंधनकारक आहे. या संदर्भात ESIC चे अद्यावयात नियम आणि कंत्राटसाठीच्या अटीचे पालन करणे आवश्यक आहे.

४६) निविदा प्रक्रियामध्ये सहभागी होणाऱ्या कंत्राटदाराकडे स्वत:चा १७ अंकी ESIC नोंदणी कोड असणे आवश्यक आहे. ज्या कर्मचाऱ्याचे मासिक वेतन २१०००/- रुपयाच्या आत आहे त्यांना या योजनेचा लाभ देणे बंधनकारक आहे.

४७) वर्गणीचे दर सध्याच्या केंद्र सरकारच्या नियमानुसार (जुलै २०१९ पासून लागु)नियोक्ता हिस्सा३.२५% असेल तसेच कर्मचाऱ्याचा हिस्सा ०.७५% असेल. असे एकुण ४% ESIC वर्गणी भरणा करणे आवश्यक आहे.

४८) कंत्राटदारांनी देयक सादर करतांना मागील महिन्यामध्ये ESIC चे भरणा केलेले चलन जोडणे आवश्यक आहे.

४९) भविष्य निर्वाह निधी १९५२ नुसार कंत्राटदाराने पात्र कर्मचाऱ्यांच्या मुळ वेतनाच्या १२% रक्कम कपात करुन त्यामध्ये नियोक्ता शेअर १३% (प्रशासकीय शुल्कासह) हिस्सा मिळवून एकुण २५% रक्कम दरमहा १५ तारखेच्या आत EPFO कडे जमा करणे बंधनकारक आहे.

५०) सादर केलेल्या मजूरीच्या देयकाची पडताळणी करतांना संबंधित कर्मचाऱ्यांच्या युएएन (UAN) पोर्टलवरील ई-चलन कम रिसिप्ट (ECR) ची खातरजमा आस्थापना विभागातर्फे करण्यात येईल.

५१) ठेकेदाराने त्यांच्या मनुष्यबळाची व्यवस्था पाहण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित सर्व रेकॉर्ड मेंटेन करण्यासाठी एक कर्मचारी पूर्णवेळ कार्यालयात उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.सदर उपलब्ध कर्मचाऱ्यांकडुन कर्मचाऱ्यांची दैनंदिन नोंदवही अद्यावयात करणे, प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या दर महिन्याचे वेतन चलन व्यवस्थीतरित्या नस्ती मध्ये ठेवणे आणि कर्मचाऱ्यांच्या मागणीप्रमाणे वितरीत करणे तसेच पुरवठा केलेल्या मनुष्यबळाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती नगरपरिषदेस उपलब्ध करुन देणे इत्यादी कामे सदर कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात यावीत.

५२) कंत्राटदार संस्थानी पुरविलेल्या कर्मचाऱ्यांचे मासिक हजेरीपत्रक, भविष्य निर्वाह निधी त्या त्या महिन्यात भरल्याबाबत मासिक हजेरीपत्रक, कामगारांचा रिव्हेन्यू स्टॅम्प लावून त्यावर संबंधित कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी असलेले वेतन रजिस्टर कामगारांच्या यादीसह ई.सी.आर, ई.एस.आय. चलन, कामगार कल्याण निधी तसेच सर्व शासकीय लेव्हलची पुर्तता केलेबाबत तसेच संबंधित कामगारांचे मागील महिन्याचे वेतन बँकेमार्फत Account Payee Cross Cheque (रेखांकित धनादेश) व्दारेच अदा केल्याचा पुरावा दरमहा सादर केल्यानंतरच सदर कंत्राटदारांचे त्या महिन्याचे देयक अदा करण्यात येईल.

५३) कंत्राटदारांने कामकासाठी नेमलेल्या कामगांरांचे मासिक वेतन महिन्याच्या १० तारखेस करणे बंधनकारक आहे.

५४) पुरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना नियमानुसार साप्ताहिक सुट्टी तसेच मासिक वेतन चिठ्ठी देण्यात यावी.

५५) किमान वेतन दरापेक्षा कमी दराने वेतन अदा करता येणार नाही. वेतन दरापेक्षा कमी दराने वेतन दिल्याचे निर्दशनास आल्यास वेतनातील फरक संबंधित कर्मचाऱ्यांना अदा करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

५६) मा. कामगार कार्यालयामार्फत दर सहा महिन्यांनी प्रसिद्धी करण्यात येणाऱ्या सुधारीत विशेष भत्ता प्रमाणे कर्मचाऱ्यांना वेतन अदा करणे आवश्यक राहील. त्याप्रमाणे सुधारित विशेष भत्यामध्ये वाढ करुन वेतनातील फरक अदा करण्यात येईल.

५७) ज्या कंत्राटी कामगारांनी मा.न्यायालयात दावे दाखल केले आहेत अशा कामगारांना प्रस्तुतचे किमान वेतन लागु राहील.

५८) सदर करारनात्यातील अटी व शर्ती कमी-जास्त करण्याचा अधिकार आळंदी नगरपरिषदेस राहील.

**कंत्राटदाराची स्वाक्षरी**

**मुख्याधिकारी**
आळंदी नगरपरिषद, आळंदी

साक्षीदार सही

१)नांव - सही -

२)नांव- सही -

## परिशिष्ठ -B

## PROFORMA OF AFFIDAVIT/ UNDERTAKING

## On Stamp Paper of Rs.१००/-

मी याव्दारे हमीपत्र / प्रतिज्ञापत्र सादर करतो की, वरील सर्व माहिती मी वाचली असून ती मला मान्य आहे. तसेच निविदा सोबत सादर करण्यात येणारी सर्व कागदपत्रे खरी आहे. गेल्या ५ वर्षामध्ये शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्था / महामंडळाने काळ्या यादी टाकलेले नाही.तथापि मी सादर केलेली कागदपत्रे खोटी आढळल्यास माझेवर भारतीय दंड संहिता अंतर्गत कारवाईस मी पात्र राहील याची मला जाणीव आहे. करिता आज रोजी लिहून देत आहे.

निविदाधारकाची स्वाक्षरी

## परिशिष्ठ -C

## प्रतिज्ञापत्र (नगरसेवक हस्तक्षेप नसलेबाबत)

## (रु. १०० चे स्टॅम्प पेपरवर)

मी / आम्ही याव्दारे असे नमूद करतो की, महाराष्ट्र नगपरिषदां, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६(१) (आय) व कलम ४४ (१) (ब) तरतुदीच्या ज्या खाली उदधृत केलेल्या आहेत, माहिती आहे आणि गंभीरपणे नमूद करतो की, नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या संविदेमध्ये नगरपरिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबध किंवा आमच्याशी भागेदारी नाही.

**कलम १६(१)(आय):-** यापुढे तरतुद केली असेल त्या व्यतिरीक्त, नगरपालिकेच्या आदेशावरुन केलेल्या कोणत्याही कामात किंवा नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत जीचा स्वत:चा किंवा आपल्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या हिस्सा किंवा हितसंबध असेल.

**कलम ४४(१)(ब) :-**पालिका सदस्य म्हणून किंवा नगरपालिकेच्या कोणत्याही समितीचा सदस्य म्हणून ज्या कोणत्याही बाबतीत कलम १६ चे पोट कलम (३), खंड (अ), (ब), (क), (इ) व (ग) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्याचा किंवा त्याचा भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रितीने कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल मग अशा हिश्याची किंवा हितसंबंधाची किंमत काहीही असो किंवा जीत अशीलाच्या, प्रकर्त्याच्या किंवा इतर व्यक्तीच्या वतीने व्यावसायिक दृष्ट्या त्याचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबतीत मतदान करील.

निविदाधारकाचे नांव :- ---------------------------------------------------

पत्ता :--------------------------------------------------- निविदाधारकाची सही

दिनांक :-

साक्षिदाराचे नांव :- ---------------------------------------------------

पत्ता :- --------------------------------------------------- साक्षिदाराची सही

दिनांक :-

# परिशिष्ट-D

# कुशल व अर्धकुशल मनुष्यबळ पुरवठा करणे

## इतर विशेष अटी व शर्ती

१) सदर निविदेतील कामाचा तपशिल अनामत, बयाणा रक्कम, नियम अटी व शर्ती, निविदा शेड्युल. इत्यादीची माहिती महाराष्ट्र शासनाचे https://mahatenders.gov.inसंकेत स्थळावर उपलब्ध आहे.

२) निविदाधारकाने निविदेची फॉर्म फी व बयाणा रक्कम मनपाच्या खात्यात पेमेंट गेट वे सिस्टीमद्वारे (ई-बँकिंगद्वारे) भरावयाची आहे.ठेकेदारांना कामाचे देयक E.C.S. / N.E.F.T. द्वारे करणेत येतील.याबाबत ठेकेदाराने ई-पेमेंटसाठी नमुना फॉर्म भरुन देणे आवश्यक आहे.

३) निविदा उघडण्याच्या वेळी निविदा धारक स्वत: अथवा त्याचा अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतो.

४) निविदा धारकाने सादर केलेल्या दरावर नियमानुसार ५%अनामत रक्कम भरावी लागेल व नियमानुसार आवश्यक रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर स्वखर्चाने करारनामा करुन द्यावा लागेल.

५) कामाच्या निविदा रक्कमेच्या ५% प्रमाणे होणाऱ्या रक्कमेतून १% बयाणा रक्कम वजा जाता उर्वरीत ४% रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट (Demand Draft) मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद यांचे नावे सादर करावा लागेल.

६) उपरोक्त कामासाठी खालीलप्रमाणे अद्ययावत कागदपत्रे व यंत्रणा असणारे निविदाधारक निविदाभरण्यास पात्र राहतील.निविदेसोबत सत्यप्रतीसादर करावयाची कागदपत्रे पुढीलप्रमाणे(निविदा अटी/शर्तीमध्ये नमूद केलेल्या कागदपत्रा व्यतिरिक्त अनावश्यक कागदपत्रे जोडू नयेत, ती ग्राह्य धरली जाणार नाहीत.): -

A. संस्थानोंदणीप्रमाणपत्र.
B. मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ नुसार संस्थेचा नोंदणी परवाना (शॉप ॲक्ट लायसन्स), कंपनी कायदा १९५६ नुसार कंपनी नोंदणी प्रमाणपत्र अथवा संस्थेचे धर्मादाय आयुक्त यांचेकडील नोंदणीकृत संस्था/मंडळ प्रमाणपत्र,
C. जी.एस.टी. नोंदणी (रजिस्ट्रेशन) प्रमाणपत्र व क्लिअरन्स सर्टीफिकेट
D. आयकर रिटर्न भरल्याचा सन२०२३-२०२४, २०२४-२०२५ व २०२५-२०२६ चा पुरावा
E. संस्था / कंपनी पॅनकार्डची झेरॉक्स प्रत
F. भविष्य निर्वाह निधी नोंदणी प्रमाणपत्र व अद्ययावत चलन(मागील ३ महिन्यांचे)
G. कामगार कल्याण निधी नोंदणी प्रमाणपत्र व अद्ययावत चलन
H. व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र.
I. लेबर लायसन्स अद्ययावत असणे आवश्यक आहे.
J. धर्मादाय आयुक्त नोंदणीकृत संस्था असल्यास,निविदाधारकाने कंपनीची रचना, संचालक मंडळ, व्यवस्थापन व कामगार याचा तपशिल सादर करावा(लागू असल्यास)
K. निविसदाधारकाची मागील ३ वर्षांची सरासरी उलाढाल अंदाजपत्रकीय निविदारक्कमेच्या ३०% असल्याचेनजीकच्या कालावधीतील सनदी लेखापाल यांचेकडील प्रमाणित पत्र व नफा-तोटा प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.
**L.** ठेकेदार / संस्था यांनी यांत्रिकी पध्दतीचा वापर करुन मनुष्यबळाव्दारेदैनंदिन साफसफाई/ स्वच्छता केले बाबतचा मागील३वर्षामधीलअंदाजपत्रकीय रक्कमेच्या ८० टक्के रक्कमेइतके १ काम किंवा ५० टक्के रक्कमेइतके २ कामे किंवा ४० टक्के रक्कमे इतके ३ काम केल्याचा व खर्चाचा संपुर्ण तपशील असलेले शासकिय / निमशासकिय/ नागरी स्थानिक स्वराज्य संस्था अनुभव दाखला/ काम समाधानकारकरीत्या पुर्ण केल्याचे विभागप्रमुखाचे कामकाज आदेश / प्रमाणपत्र देणेअनिवार्य राहिल

M. निविदाकार यांनी निविदेसोबत जोडलेली(अपलोड केलेली) सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र र.रु.५००/- चे स्टँप पेपरवर नोटराइज्ड करुन लिफाफा क्र.१ मध्ये जोडणे आवश्यक आहे.

N. निविदा मंजूरी व नंतर देयके अदा करताना निविदाधारकास अथवा ठेकेदार संस्थेचे संस्थाचालक यांनी सादर केलेली अपूर्ण अथवा अर्धवट महितीशी संबंधित कागदपत्रे, खोटी अथवा बनावट कागदपत्रे असल्याची बाब निदर्शनास आल्यास त्यास कंत्राटदारपूर्णपणे जबाबदार राहिल. नगरपरिषदअधिकारी अथवा कर्मचारी जबाबदार रहाणार नाहीत. खोटया / बनावटकागदपत्र सादर केल्यानंतर भारतीय न्याय संहितेनुसार संबंधित कंत्राटदार जबाबदार राहिल व त्यांचेवर नियमाधिन कार्रवाईस पात्र राहिल. तसेच संबंधित निविदाधारक अथवा ठेकेदारी संस्थेचा काळया यादीत समावेश करण्यात येईल.

७) निविदादर हे निविदा पाकिट उघडलेचे तारखेपासून 90 दिवसाकरीता ग्राहय राहतील. परंतु अपवादात्मक परिस्थितीत ग्राहयता कालावधी वाढवणे बाबत विभागप्रमुख व त्यांचे प्राधिकृत केलेल्या अधिका-यांनी विचारणा केल्यास ग्राहयता कालावधी वाढवून द्यावा लागेल.

८) सदर ठेक्यामध्ये एकुण कामगार हे ४९ पेक्षा जास्त ठेवता येणार नाही.

९) शासनाकडील सुधारित / नवीन कर लागू झाल्यास अथवा प्रचलित करामध्ये वाढ झाल्यास संपूर्ण कर भरण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची राहील. देयकाच्या रकमेवर शासन नियमानुसार लागू असलेला वस्तू व सेवाकर स्वतंत्ररित्या अदा करण्यात येईल.

१०) कामाचे बिल दरमहा अदा केले जाईल. तथापी कंत्राटदाराने किमान ४ महिन्याचे पुर्ण वेतन कार्यरत कामगारांना स्वत: अदाकरणे बंधनकारक राहील.

११) सदर कामावर नियंत्रण ठेवणेसाठी नगरपरिषद नियुक्त करील अशा नियंत्रीत अधिकारी यांचे दैनंदिन कामकाजसमाधानकारक पार पाडल्याचा अहवाल दिल्यानंतरच बिल अदा केले जाईल.

१२) सदर निविदाधारकांनी पुरविण्यात आलेल्या कामगारांना खालील नियम लागु राहतील.

a. ठेकेदार नियुक्त कर्मचाऱ्यांना विहित रंगातील गणवेश परिधान करणे(गणवेशाचा पॅटर्न एकाच प्रकारचा असावा), दर्शनी भागावर ओळखपत्र लावणे बंधनकारक राहिल.

b. ठेकेदारांने नियुक्त कामगारांना कामगार कायद्यानुसार देय असलेल्या सुविधा उदा. गणवेश, ओळखपत्र, टोपी, इ. कामाचा आदेशानंतर १५ दिवसात व सुरक्षा साधने उदा. ग्लोज, मास्क इ. तात्काळ पुरविणे बंधनकारक राहील.

c. याकामी नियुक्त कामगारांची वर्षातून किमान ०१ वेळा रुग्णालयातून आरोग्य तपासणी स्वखर्चाने करणे व तसे अहवाल सादर करणे निविदाधारकावर बंधनकारक राहिल.

d. कंत्राटी कामगारांचा भविष्य निर्वाह निधी/ राज्य कामगार विमा/ कामगार कल्याण निधी इ. संबंधी पूर्ण रक्कम त्या त्या महिन्यात संबंधीत संस्थेकडे भरलेबाबत चलन, इ.सी.आर प्रपत्र व अनुषंगिक कागदपत्रे तसेच कंत्राटदार संस्थांनी कामगारांचे मासिक हजेरीपत्रक, कामगारांचा रेव्हेन्यू स्टँप लावून त्यावर संबंधित कामगारांची स्वाक्षरी असलेले वेतन रजिस्टर, कागदपत्रे, कामगारांच्या यादीसह कामगार कल्याण निधी तसेच सर्व शासकीय कागदपत्रांची पूर्तता करणे बंधनकारक राहिल.

e. सदर कामावर बालमजूर ठेवता येणार नाही. तसेच याकामी नियुक्त कामगार कोणतेही अंपगत्व नसलेले, शारीरीक दृष्ट्या सक्षम असावेत. त्यांची वयोमर्यादा १८ ते ६० वर्ष दरम्यान असावी. नेमून दिलेले कामकाज पूर्ण करणेची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदाधारक यांची राहिल.

१३) सदरचे कामकाजाच्याआवश्यकतेनुसार / मागणीनुसार व मुख्याधिकारी, यांचे निर्देशानुसार कामगार उपलब्ध करणे आवश्यक राहील. निविदाधारकाकडील नियुक्त कामगार गैरहजर राहिल्यास अथवा कमी पुरविल्यास त्याची पर्यायी व्यवस्था करण्याची जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहिल. तसेच कामाच्या त्रुटींचे मूल्यांकन करुन संस्थेच्या मासिक देय बीलातून रक्कम कपात करण्यात येईल. कामगारांच्या संख्येत वाढ अथवा घट करण्याचे अधिकार मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद यांनी राखून ठेवले आहेत.

१४) ज्या निविदाधारकास अथवा ठेकेदार संस्थेचे संस्थाचालकांना काम मिळेल अशा संबंधित ठेकेदाराने नियुक्त केलेले कर्मचारी नगरपरिषदेच्याकायम सेवेस पात्र असणार नसून पूर्णत: हंगामी व अस्थायी स्वरुपाची असल्याने त्यांची नेमणूक निविदा कालावधी मयादेपर्यंत राहिल.

१५) ज्या निविदाधारकास अथवा ठेकेदार संस्थेचे संस्थाचालकांना काम मिळेल अशा निविदाधारकास किमान वेतन कायद्यातील तरतुदींची पुर्तता करावी लागेल. तसेच किमान वेतन कायद्यानुसार किमान वेतन दरापेक्षा कमी दरांची निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर कामकाजासाठी ठेकेदाराने नियुक्त केलेल्या कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन अदा करणे बंधनकारक राहील. तसेच निविदाकालावधीमध्ये दर सहा महिन्यांनतर कामगार कार्यालयाकडुन किमान वेतन दरातील विशेष भत्त्याचे सुधारित दर जाहीर केले जातात, त्यामुळे कामगारांना सुधारित दराने विशेष भत्ता देय्य राहील. तथापि नगरपरिषदेकडुन विशेष भत्यामध्ये वाढ झालेली रक्कम अदा केली जाणार नाही हे ग्राह्य धरुनच निविदाधारकांनी दर नमुद करावेत.

१६) ज्या निविदाधारकास अथवा ठेकेदार संस्थेचे संस्थाचालकांना काम मिळेल अशा संबंधित ठेकेदाराने नियुक्त केलेल्या कामगारांना किमान वेतनदराने वेतन अदा केले बाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

१७) ज्या निविदाधारकास अथवा ठेकेदार संस्थेचे संस्थाचालकांना काम मिळेल अशा संबंधित ठेकेदाराने नियुक्त केलेल्या कामगारांना किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार साप्ताहिक सुट्टी देण्यात येईल.

१८) ई- निविदा दर सादर करत असताना निविदा अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १ टक्के पेक्षा जास्त सेवा शुल्क दर सादर करणेत यावे. तसेच एक पेक्षा अधिक ठेकेदारांचे समान दर प्राप्त झाल्यास निविदा स्विकारणे अथवा फेटाळणे इत्यादी सर्व अधिकार निविदा समितीने राखुन ठेवले आहे.

१९) निविदाधारकास मुदतपुर्व काम बंद करावयाचे झाल्यास, त्यांनी किमान ९० दिवस लेखी पूर्वसूचना देणे बंधनकारक राहील.

२०) ज्यांची निविदा स्विकृत करणेत येईल, त्यांना स्वखर्चाने योग्य त्या स्टँम्प पेपरवर नगरपरिषदेस करारनामा करुन द्यावा लागेल व संबंधित ठेकेदार/ ठेकेदार संस्थेचे संस्थाचालक यांनी नगरपरिषदेचेविद्यमान नगरसेवक/ स्वीकृत नगरसदस्य व नगरपरिषद अधिकारी/ कर्मचारी अथवा त्यांचे नातेवाईक यांचेशी संबंधित नसल्याचे नोटराईज्ड हमीपत्र करुन द्यावे लागेल.

२१) महाराष्ट्र शासन रोजगार व स्वंयरोजगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.रोस्वरो-२००२-प्र क्र.२६७/रोस्वरो-१ नवीन प्रशासन भवन, १४ वा मजला, मंत्रालय, मुंबई – ४०००३२ दि.१७ ऑगस्ट, २००२ नुसार बयाणा रकमेमध्ये १०० टक्के सुट अनुज्ञेय राहील.

२२) निविदाधारकांनी एकदा निविदा भरल्यानंतर कोणत्याही कारणास्तव अथवा परिस्थितीत निविदा रद्द केली जाणार नाही. तसेच कोणत्याही टप्पावर पात्र असूनही माघार घेतल्यास अशा ठेकेदारासह सर्व पात्र दरांचे पाकीट उघडण्यात येईल. याबाबत कोणत्याही हरकती/ सुचना कार्यालयाकडे पाठवु नयेत व त्या ग्राह्य धरल्या जाणार नाही.

२३) निविदाधारकास अथवा ठेकेदार संस्थेचे संस्थाचालक यांनी आवश्यक सर्व कागदपत्रांची पूर्तता न केल्यास, अपूर्ण अथवा अर्धवट महितीशी संबंधित कागदपत्रे, खोटी अथवा बनावट कागदपत्रे, अटीयुक्त निविदा सादर केलेस, विहित बयाना रक्कम न भरल्यास तसेच मुदत कालावधी समाप्ती नंतर सादर केलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२४) ज्यांची निविदा स्विकृत होईल त्या निविदाधारकास कामाचा आदेश दिल्यानंतर त्वरीत काम चालू करणे बंधनकारक राहील. निविदा कामकाजाबाबत निविदा धारकाकडून अटी शर्तीचे पालन अथवा कामकाज समाधानकारक होत नसल्याचे निदर्शनास आल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता करार रद्द करुन कामकाज काढण्यात येईल तसेच सदर कामकाजाचा ठेका संपुष्टात आणणेत येईल व संपूर्ण अनामत रक्कम जप्त करणेत येईल. सदरचा ठेका अन्य कोणत्याही निविदाधारकास पोट ठेक्याने देता येणार नाही.

२५) भविष्यात संबंधित कामकाजाबाबत लेखापरिक्षण आक्षेपाव्दारे वसुली रक्कम निघल्यास त्याची पुर्तता करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल. याकामी आवश्यक ते सहकार्य करण्याची जबाबदारी संबधित ठेकेदाराची राहील.

२६) दैंनदिन कामातील त्रुटींबाबत खालीलप्रमाणे दंड आकारणेत येईल.

| अ.क्रं. | कामातील त्रुटीचा तपशिल | दंड र.रु. |
|---|---|---|
| १ | कामगार कमी पुरविलेस | प्रति कामगार ०१ दिवसाचे वेतन |
| २ | कामकाज समाधानकारक न झाल्यास | प्रतिदिन र.रु. १०००/- |
| ३ | गणवेश परिधान न केल्यास | प्रति कामगार प्रति दिन र.रु. १००/- |
| ४ | ओळखपत्र न लावल्यास | प्रति कामगार प्रति दिन र.रु. ५०/- |
| ५ | सुरक्षा साधनांचा वापर न केल्यास | प्रति कामगार प्रति दिन रु.रु. १००/- |

२७) निविदाधारकांकडील कंत्राटी कामगारांना म.न.पा.कर्मचा-यांचे संप/ हरताळ इत्यादीमध्ये भाग घेता येणार नाही.

२८) भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२, कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम १९७० व इतर (अन्य) कामगार कायद्यातील सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता स्वतः ठेकेदार यांनी करावयाची आहे, त्यासाठी विहित नमुन्यातील र.रु.५००/- चे स्टँप पेपरवर संबधित ठेकेदार/ठेकेदार संस्थेचे संस्थाचालक यांना प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल. तसेच भविष्यात शासना कडील नवीन आलेल्या कायद्याप्रमाणे किंवा नियमानुसार कर/ फी भरणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

२९) निविदाधारक तसेच नियुक्त कामगार यांचेवर कोणत्याही प्रकारचे पोलिस रेकॉर्ड नसावे व ते शुध्द चारित्र्याचे असणे आवश्यक आहे.

३०) प्रस्तुत कामकाजाच्या संदर्भातील शासनाचे शासन निर्णय, परिपत्रके, आदेश, मार्गदर्शक सुचना इ.चे अनुषंगाने अथवा नगरपरिषद मार्फत वेळोवेळी निर्गमित आदेश, परिपत्रके, मार्गदर्शक सुचना, सदर निविदा संबंधित कागदपत्रे, कामकाज आदेश, पत्रव्यवहार इ. बाबी या सदर कामाचा अविभाज्य भाग राहिल व त्याचे पालन करणे निविदाधारकावर बंधनकारक राहिल.

३१) निविदाधारकामार्फत ठेकेदारी पध्दतीने नियुक्त आलेला कर्मचारी हा नगरपरिषदेच्या कायम सेवेस पात्र असणार नसून पूर्णतः हंगामी व अस्थायी स्वरूपाचे असून नेमणूक निविदा कालावधी मर्यादित राहील. सदर पदांचा नगरपरिषदेशीकाहीही संबंध राहणार नाही. तसेच ठेकेदार नियुक्त कामगारांचे सर्व प्रकारचे दावे, क्लेम्स इ. बाबीस संबंधित निविदाधारक अथवा ठेकेदार संस्थेचे संस्थाचालक जबाबदार राहतील.

३२) अटीयुक्त निविदा स्विकारली जाणार नाही. सदरची निविदा मंजूर करणे अथवा नामंजूर करणे अथवा कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार नगरपरिषदेनेराखून ठेवले आहेत.

३३) ठेकेदारी पद्धतीने पुरविण्यात येणा-या कामगांराचे नाव, वय ,पत्ता इ. वैयक्तिक माहिती, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र, पासपोर्ट साईज फोटो, जन्मतारखेचा पुरावा (जन्माचा दाखला/ शाळा सोडल्याचा दाखला), रहिवाशी दाखला (आधार कार्ड /रेशन कार्ड) बाबतचे प्रमाणपत्र यांच्या छायांकित (झेरॉक्स) सत्यप्रती जोडाव्यात. विहित नमुन्यातील त्यांचे माहिती सोबत मूळ प्रमाणपत्रे कागदपत्रे जोडू नयेत.

३४) ठेकेदाराकडुन पुरविण्यात आलेल्या कर्मचा-याने नगरपरिषद कार्यालयाची स्वच्छता राखणे अनिवार्य आहे. सदर कर्मचा-याकडुन तंबाखू खाणे, थुंकणे, मद्यपान करुन कार्यालयात कामकाज करणेव इतर कोणत्याही स्वरुपाचे व्यसन इत्यादी आढळुन आल्यास सदर कर्मचा-याकडुन नियमानुसार दंडाची रक्कम आकारण्यात येईल किंवा सदर कर्मचा-यांच्या वेतनातून कपात करण्यात येईल.

३५) सदर निविदेतील वरील सर्व अटी व शर्ती निविदाधारकांवर बंधनकारक राहील. सदर कामाचा करारनामा केल्यानंतर, करारनाम्याबाबत कोणत्याही प्रकारचा वाद अथवा मतभेद निर्माण झाल्यास तो एकमताने सोडविला न गेल्यास भारतीय लवाद कायदा १९९६ अन्वये एक सदस्य लवाद यांचेकडे सुपूर्द करण्यात यावा.

३६) निविदाधारकांसोबत सदर कामाचे करारनाम्याबाबत कोणत्याही प्रकारचा वाद अथवा मतभेद निर्माण झाल्यास तो खेड न्यायालय, जि. पुणे यांचे कार्यकक्षेत राहिल.

सही/-
मुख्याधिकारी
[illegible] नगरपरिषद

Signature Not Verified
Digitally signed by Manish Dattatray Gaikwad
Date: 2026.04.06 17:15:55 IST
Location: Maharashtra-MH